## : प्रकरण ४ थे :

# म. भा. भोसले यांची कथा - यशापयश : वाङ्‍मयीन स्थान

म. भा. भोसले यांची कथा ग्रामीण जीवनातील वास्तवाचे चित्रण करणारी कथा आहे. त्यांच्या कथेचा अभ्यास करताना त्यांच्या साहित्यातील बारकावे पाहणे गरजेचे आहे. मुळात म. भा. भोसले यांनी मनात कसलीही संकुचित भावना न ठेवता लेखन केले आहे. त्यामुळे त्यांच्या कथेला ग्रामीण कथेत एक अनुभव संपन्न कथा या स्वरुपात ओळखले गेले आहे.

सामाजिक जाणीवेतून जे लेखक कलात्मक भूमिका निर्माण करतात ते लेखन प्रभावी ठरलेले दिसते. सद्य परिस्थितीचे चित्रण करून वाचकांना आपला परिचय करून देणाऱ्या लेखकांची संख्या अलिकडे वाढली आहे. पण त्याहीपेक्षा समाजाच्या संदर्भात जेव्हा पात्रांचा विचार करून लिहिले जाते तेव्हा ते साहित्य व ती पात्रे जिवंत भासतात.

म. भा. भोसले यांनी जे लेखन केले ते अतिशय तळमळीने केले आहे. त्यांना सामाजिक जाणीवेतून कलात्मक भूमिका निर्माण करून द्यायची आहे. भोसले यांची भूमिका नम्र अभ्यासकाची आहे. त्यांचे व्यक्तिमत्व चतुरस्त्र आहे. त्यांनी खूप सोसले आहे, अनुभवलेले आहे. बऱ्या वाईट गोष्टींचा अनुभव आपल्या कथेतून वाचकांना सांगितला आहे. त्यामुळे त्यांच्या चौफेर दृष्टीचा प्रत्यय त्यांच्या कथेतून येतो. 'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' या दोन कथा संग्रहातून त्यांच्या कथा लेखनाचे स्थान स्पष्ट होते.

म. भा. भोसले यांच्या 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातील महत्वाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करुन त्यांना मिळालेल्या यशापयशाचा विचार करणे गरजेचे आहे. म. भा. भोसले यांनी ग्रामीण माणसाचे जीवन जवळून पाहिले आहे. ग्रामीण जनता, शेतकरी, मजूर यांच्या जीवनावर कथा लेखन करताना त्यांच्याशी ते जवळीकता साधतात. ग्रामीण माणसावर होणारा अन्याय पाहून त्यांचा जीव तळमळतो. तेव्हा त्या अन्यायाविरुद्ध ते आपल्या कथेतून वाचा फोडतात. त्या अन्यायाविरुद्ध प्रत्यक्ष उठाव करता येत नाही तेव्हा ते लेखनातून मांडतात. त्यांनी ज्यावेळी मध्यमवर्गीय माणसाचे दुःख जवळून पाहिले

तेव्हा 'आजोबांची डायरी' ही पहिली ग्रामीण कथा लिहिली. मुंबईच्या 'निर्भीड' साप्ताहिकात ती प्रसिद्ध झाली.

'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' हे अस्सल ग्रामीण कथांचे संग्रह आहेत. ग्रामीण व्यवस्थेत शेतकरी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तो ग्रामीण व्यवस्थेचा पाया असतो. त्याचे चित्रण ग्रामीण कथेत महत्त्वपूर्ण ठरते. शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाचे प्रभावी चित्रण भोसले यांच्या ग्रामीण कथेतून आढळते त्यामुळे त्यांच्या कथेसंदर्भात कृषिसंस्कृतीला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

समाजातल्या जास्तीत जास्त माणसांना जीवनात दारिद्र्याला सामोरे जावे लागते. उपेक्षित, कष्टकरी, श्रमिक, शेतकरी यांच्या वाट्याला येणारा दारिद्र्य हा महत्त्वाचा घटक असतो. त्याचे प्रभावी चित्रण भोसले यांच्या कथासंग्रहातून झालेले आढळते.

समाजात दु:खपीडीत माणसे हर तऱ्हेचे जीवन जगत असतात. त्या माणसांच्या कौटुंबिक नात्याचे चित्रण करणारे हे दोन कथासंग्रह आहेत. व्यक्तीच्या कुटुंबातील असंख्य प्रश्न, त्यांचे एकमेकांशी वागणे या साऱ्या गोष्टी भोसले चित्रित करतात.

भोसले यांच्या कथेची भाषाशैली साधी, सोपी, सरळ व सहज समजणारी आहे. त्यामुळे त्यांची कथा अल्पावधीतच सर्वसामान्य वाचकापर्यंत पोहचली तिचे कौतुक झाले. त्यांच्या कथा 'मनोहर', 'किर्लोस्कर', 'निर्भीड' या मासिकातून प्रसिद्ध झाल्या.

म. भा. भोसले यांनी 'अहेव लेणं' या कथासंग्रहातून ग्रामीण समाजातील संघर्षमय जीवनाचे, कौटुंबिक प्रेमाचे व माणसांच्या माणुसकीचे चित्रण घडविल्याने त्यांचा हा कथासंग्रह सामान्य वाचकापर्यंत पोहचला. त्याचबरोबर भोसले यांनी आपल्या कथेतून वास्तव प्रसंगांना प्राधान्य दिले त्यामुळे कथा वाङ्मयात त्यांच्या कथेला विशिष्ट स्थान निर्माण झाले. कथेबाबत वाचकांच्या मनात विश्वास निर्माण झाला. त्यांच्या कथेबद्दल गंगाधर गोरजे यांनी म्हटले की,

''भोसल्यांनी कथांच्या द्वारे आजच्या सरकारी घोषणावर टाकलेला प्रकाश खरंच विचार करायला लावणारा आहे. विशेषत: ग्रामीण समाजातील जीवन व राजकीय जीवन त्या संदर्भात तपासून

घेण्याची आवश्यकता आहे. 'गोर्वीचं गोकुळ' मधील मोरे मास्तर महार आहेत. हेडमास्तर त्यांना त्यांची जात विचारतात. वर्गात हे महार मास्तर अशी ओळख करून देतात. त्यांना गावात रहायला जागा मिळत नाही. 'जातीयता नष्ट करा' या घोषणेतील वैयर्थ्य लक्षात येते. जातीयतेची खोलवर रूजलेली मुळे घोषणांनी उखडून निघतील काय ? याचा खोलवर विचार करणे भाग पडते. भोसले यांनी हे चित्रण घडविले आहे.''[१]

यावरूनच या कथासंग्रहातील कथांचे यश लक्षात येते.

'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातून स्वातंत्र्यानंतर बदललेल्या समाजस्थितीचे, ढासळलेल्या मानवी जीवनाचे दर्शन घडविल्याने हा कथासंग्रह प्रभावी ठरला आहे. भोसले यांनी यातून मानवी भावनांना जास्त प्राधान्य दिले आहे. त्यामुळे या कथासंग्रहातील कथा वाचकांच्या पर्यंत लवकर पोहचलेली दिसते. या कथासंग्रहाबाबत 'विशाल सह्याद्रि' - पुणे मध्ये म्हटले आहे की,

''म. भा. भोसले यांच्या निव्वळ ग्रामीण जीवनावरील कथांचा हा संग्रह वाचताना वाचकांना आपण नव्या वातावरणात आहोत असे वाटते. छोटी वाक्ये, चटकदार व चमकदार शब्दफेकी आणि रसपूर्ण संवाद यांनी नटलेल्या कथांची शैली ग्रामीण वातावरण उभे करण्यास समर्थ आहे. यातील प्रसंग आणि घटना शहरात घडत आहेत असे फारसे कुठे वाटत नाही. एखाद्या खेड्यातील बोली आणि प्रसंग आपण अनुभवित असल्याचा प्रत्यय आरंभा-अखेर पर्यंत आपणास येतो.''[२]

या साऱ्या गोष्टी भोसले यांच्या या कथासंग्रहाला यश मिळवून देणाऱ्या ठरल्या आहेत.

भोसले यांचा 'अहेव लेणं' हा कथासंग्रह १९५१ साली प्रकाशित झाला तेव्हा ग्रामीण कथेत, व्यंकटेश माडगूळकरांची नवकथा सरस ठरली होती. भोसले यांची कथा याच काळात बहरास येऊन, समीक्षकांनी तिची योग्य दखल घेऊनही तिला म्हणावे तितके यश मिळाले नाही. ती सामान्य वाचकापर्यंत पोहचली पण वाङ्मयीन निकष लाऊन तिचा कितपत विचार केला गेला ? त्यांनी सकस, रंगतदार कथा लिहिल्या पण यशस्वी कथाकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले नाही.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण जीवनाला एक विशिष्ट रूप प्राप्त झालेले असताना साक्षरता, सहकार चळवळ, आरोग्य केंद्रे, शाळा यांना प्राधान्य दिले गेले तेव्हा त्याला अनुसरूनच भोसले यांनी मानवी भावनांचे विविधरुपी दर्शन घडविणारी कथा 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातून लिहिली पण तिला म्हणावे तितके यश मिळाले नाही.

भोसले यांनी 'अहेव लेणं' या कथासंग्रहातून खेडेगावातील माणसांचे, त्यांच्या सुखदु:खाचे, समस्यांचे चित्रण केले ही आवश्यकता त्यांना मोठ्या प्रमाणावर वाढली. कारण ग्रामीण पार्श्वभूमीवर अतिरंजित, अवास्तव घटना रंगवून सांगणे हे ते कथालेखनाचे उदिष्ट मानतात. 'अहेव लेणं' या कथासंग्रहातील 'अहेवं लेणं' या कथेबाबत वासुदेव मुलाटे म्हणतात,

''या कथेतला रामजी अजारी पडून पंथाला लागलेला असताना त्याच्या मनात येते की चटकन उठावं आपल्या घराचा कोप्रान्‌कोपरा डोळ्यानं बघावा अन् नव्या आणलेल्या खिल्लारी जोडीच्या गाडीतून फिरुन यावं''[३]

या कथेतून एका कौटुंबिक नात्याचे चित्रण त्यांनी घडविले आहे.

म. भा. भोसले यांच्या 'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातील कथा ग्रामीण वातावरणाशी एकरूप होतात, त्या भावनेला प्राधान्य देतात. भोसले कौटुंबिक दु:खे आपल्या कथेतून मांडतात. कुटुंबातल्या कर्त्या पुरूषाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव शेवटपर्यंत ते करून देतात. त्यांनी आपल्या कथेतून माणूसकीला सामोरे जाणारा नायक रंगविल्याने या कथा संग्रहांचा शेवटपर्यंत गौरव झाला.

'अहेव लेणं' या कथासंग्रहाबाबत 'मौज' मुंबई ने म्हटले आहे की,

''ग्रामीण जीवनाचे निष्ठेने व जिव्हाळ्यानें चित्रण करणारे म्हणून श्री. भोसल्यांचे नांव झाले आहे. त्यांत भर घालील असाच त्यांचा हा नवा 'अहेव लेणं' हा कथासंग्रह आहे.''[४]

म. भा. भोसले यांच्या एकूण कथा वाङ्मयाचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांनी आपल्या कथालेखनाचे सारे श्रेय आपले गुरू व वाचनात आलेल्या पुस्तकांना दिले आहे. त्यांनी ज्या कथा लिहिल्या त्यांना ग्रामीण पार्श्वभूमीवर योग्य त्या प्रकारचे यश मिळाले. त्यांच्या कथेने सर्वसामान्य वाचकांच्या मनाची पकड घेतली याचे कारण ग्रामीण माणसाच्या अतीव दु:खाचा त्यांनी वेध घेतला त्यामुळे त्यांच्या कथेसंदर्भात अनेक समीक्षकानी आपली मते व्यक्त केली.

श्री. के. क्षीरसागर म्हणतात,

''रा. भोसले हे आजकालच्या ग्रामीण जीवनाचे जागृत प्रेक्षक व चित्रकार आहेत. त्यांचे डोळे उघडे आहेत, मन जागृत आहे व भाषा 'मळलेली' आहे. त्यांच्या लिखाणांत आजच्या राजकीय, सामाजिक, आणि गुह्य झगड्यांचे उद्बोधक प्रतिध्वनि आहेत.''[५]

एकंदरीत भोसले यांची कथा भावना प्रधान आहे. ती वास्तवतेला जास्त प्राधान्य देते. त्यांच्या संपूर्ण कथेसंबंधी समीक्षकांनी काढलेले उद्‌गार महत्त्वपूर्ण वाटतात. डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,

''ठोकळ- दिघे यांच्याच वळणाने जाणारी परंतु गुणात्मकदृष्ट्या त्यातून सरस असणारी कथा म. भा. भोसले यांनी लिहिली आहे. योगायोग, चमत्कृतीजन्य कलाटणी इ. इथेही आहे परंतु भोसल्यांना ग्रामीण जीवनाची नेमकी सुखदु:खे माहीत आहेत.''[६]

म. भा. भोसले यांची कथा जास्तीत जास्त वाचकापर्यंत पोहचते तेव्हा तिला मिळालेले यश महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात येते.

भोसले यांच्या कथेचे काही वैशिष्ट्यपूर्ण गुण आनंद यादव यांनी सांगून त्यांच्या कथेचे कथा वाङ्मयातील सामर्थ्य दाखवून दिले आहे, याचाही जाणीवपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. त्यांच्या कथेबाबत आनंद यादव म्हणतात,

''म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनावर निष्ठा ठेऊन ग्रामीण कथा सातत्याने लिहिल्या आहेत. पण त्यांची कथा एकपदरी झालेली दिसते. ती क्वचितच संघर्ष जिवंतपणे पकडते. त्यांचा हा

क्वचित दिसणारा संघर्षही स्थूल, सांकेतिक, अनाकर्षक असा असतो. निवेदनशैलीत ही सरळपणा आहे. जीवनाची अर्थपूर्णताही त्यांना सखोलपणे जाणवल्यासारखी वाटत नाही. या सर्वांमुळे त्यांची कथा ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक असूनही कुठेही जोर घेत नाही. त्यामुळे सतत निष्ठेने लिहूनही ते असे बाजूला पडल्यासारखे वाटतता.''[७]

आनंद यादव यांनी म. भा. भोसले यांच्या कथालेखनासंबंधी जे विवेचन केले आहे त्यातून भोसले यांच्या लेखन मर्यादा स्पष्ट होतात. यादव यांच्या मते कथा वाङ्मयात सातत्याने ग्रामीण कथा लिहूनही भोसले यांची कथा वारंवार एकच सूर पकडते. ती वारंवार दारिद्र्य, दुःख, माणुसकी याचेच चित्रण घडविते त्यामुळे ती एकपदरी वाटते. त्या कथेतून येणारा संघर्ष हा प्रभावी वाटत नाही.

उदा. - 'शिवना परीट' या कथेतला नायक शिवना हा सावकाराची जमीन परत द्यायला तयार नाही. तो आपली फरशी कुऱ्हाड घेऊन कब्जा घ्यायला आलेल्या सावकाराला आडविण्याचे ठरवितो. त्याच्या बरोबर तो तीव्र संघर्ष करण्याचे ठरवितो. पण शेवटी शेतात गेल्यानंतर त्याचा विचार बदलतो व आपण करतो ते वाईट आहे, चुकीचे आहे असे त्याला वाटते व तो सावकाराला कब्जा द्यायला तयार होतो. येथे हा संघर्ष जिवंत वाटत नाही त्यामुळे हा संघर्ष वेगवेगळया प्रकारचा दिसून येत नाही. त्याच बरोबर तो संघर्ष विनाकारण मोठा वाटतो. तो ठरवून घडवून आणला आहे असे वाटते. त्यांची निवेदनशैली सरळ आहे. पूर्वलक्षी निवेदन पद्धतीचा त्यांनी क्वचितच वापर केला आहे. ग्रामीण जीवनात वावरुन त्या जीवनाचा सखोल अभ्यास त्यांना करता आला नाही. या सर्व गोष्टीमुळे त्यांची कथा ग्रामीण जीवनाशी एकरूप होऊन ती नवकथेएवढी प्रभावी दर्जाची ठरली नाही. ती सकस असे वाङ्मयीन गुण निर्माण करु शकली नाही. या सर्व बाबतीत ती अपयशी ठरली. नवकथेत तिचे नाव घेतले गेले नाही ती बाजूलाच राहिली असे यादव यांना वाटते.

मराठी कथा वाङ्मयातील संपूर्ण कथेचा विचार करता त्यात काही कथा श्रेष्ठ दर्जाची ठरली आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या नवकथेचा त्याबाबत विचार करावा लागतो. तर मराठी कथेत बरीच कथा चांगल्या दर्जाची ठरली आहे. मुळात चांगली कथा आणि श्रेष्ठ कथा यात फरक असतो. चांगली कथा सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचून ती त्यांना आवडते. तिच्यात बरेच वाङ्मयीन गुण आढळतात. तर श्रेष्ठ

कथा सर्व अंगानी परिपूर्ण असते. आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या ती समृद्ध असते. कथा वाङ्मयातून तिचे महत्त्व कधीही कमी होत नाही. त्यामुळे तिला श्रेष्ठ कथा असे म्हटले जाते.

एकूण मराठी कथेत म. भा. भोसले यांची कथा वाचकांच्या दृष्टीने चांगल्या दर्जाची आहे. ती ग्रामीण परिसराचे उठावदार चित्रण घडविते. समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचते. त्यांच्या विचारांशी ती एकरूप होते पण ती श्रेष्ठ ठरत नाही, याचे कारण आनंद यादव यांनी वर सांगीतल्या प्रमाणे ती एकपदरी झालेली दिसते. ती क्वचितच संघर्ष पकडते आणि तो संघर्षही स्थूल, सांकेतिक व अनाकर्षक असतो. त्यामुळे ती सखोलपणे जागवल्यासारखी वाटत नाही.

म. भा. भोसले यांनी आत्तापर्यंत ज्या कथा लिहिल्या त्यांना उपेक्षा तर सहन करावी लागली आहेच पण काही जाणकार साहित्यिकांनी व समीक्षकांनी त्यांच्या कथेबाबत मुक्तपणे त्यांचे कौतुक केले आहे. यावरुन त्यांची कथा कोणत्या दर्जाची आहे हे समजून येते. भोसले यांच्या 'अहेव लेणं' या कथासंग्रहाला मुंबई सरकारने एक हजार रूपयाचे बक्षिस देऊन त्यांचा गौरव केला तेव्हा 'किर्लोस्कर' मासिकाचे कार्यकारी संपादक मुकुंदराव किर्लोस्कर म्हणतात,

''सरकारने भोसल्यांना बक्षिस देऊन एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. एकतर त्यामुळे त्यांच्या लेखनास उत्तेजन दिले आणि दुसरे म्हणजे आतां साहित्यिक कलावंत हे बहुजन समाजासाठी, बहुजन समाजातील पाहिजेत हे दाखवून दिले आहे.''८

साहित्यिक भोसले यांच्या कथेत समाजातील कोणकोणत्या प्रकारचे चित्रण झाले आहे या बाबत श्री. के. क्षीरसागर म्हणतात,

''रा. भोसले यांच्या लिखाणांत अस्पृश्यता (मुका मार), बेचाळीसची क्रांतिकारक चळवळ (जागत्या ज्योति, मंगल वैधव्य), शेतकऱ्यांचे जीवन (खिल्लारी जोडी) वगैरे आजकालच्या कथा लेखकास प्रिय होणारे विषय प्राचुर्याने आढळतात, त्यांच्या शैलींत आजकालच्या लोकप्रिय लेखकांच्या लेखणींतील सफाई आणि ढंगही आढळतात.''९

अशा प्रकारे भोसले यांच्या कथा वाङ्मयासंबंधी विविध साहित्यिकांनी व समीक्षकांनी त्यांचा गौरव केला आहे. नवकथेच्या काळात स्वत:ला जीवनात आपल्या कथेबाबत अपयशाचे वातावरण सहन करावे लागले असले तरी भोसले यांनी सर्व काही सहन करुन, धैर्य खचू न देता कथा प्रांतात आपले स्थान टिकवून ठेवले हे आवर्जुन लक्षात घ्यायला हवे. त्यांच्या कथेचे मर्म जाणकार समीक्षकांनी जाणले याचे कारण एका बहुजन समाजाचे, त्या समाजात वावरणाऱ्या कष्टकरी माणसाचे त्यांनी तळमळीने चित्रण केले. भोसले यांची निवेदनशैली अगदी सरळ आहे याचीही प्रचिती अनेक समीक्षकांनी दिली. म्हणून कथा वाङ्मयात त्यांना यश मिळवून द्यायला या साऱ्या गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत.

## ✳ म. भा. भोसले यांचे अन्य कथावाङ्मय आणि `अहेव लेणं` व `ग्रामीण कथा` :-

म. भा. भोसले यांचे 'गार सावली', 'नांदाय जाते', 'अहेव लेणं', 'पाहुणेर' व 'पाझर'असे ग्रामीण जीवनाचे सर्वगुणसंपन्न चित्रण करणारे पाच कथासंग्रह आहेत. 'ग्रामीण कथा' हा निवडक कथांचा संग्रह आहे. तर 'कथा जन्माची कथा' हा कथासंग्रह कथेच्या जन्मापूर्वीची कथा सांगून ती कथा देणारा आहे.

म. भा. भोसले यांच्या एकूण कथा वाङ्मयाचा अभ्यास करताना त्यांच्या सर्व कथा ग्रामीण वातावरणात जन्मल्या आहेत त्या वाचकांच्या मनावर परिणाम करतात हे लक्षात येते. ग्रामीण जीवनाचे विलोभणीय दर्शन घडविण्यात त्यांची कथा सरस ठरली आहे. भोसले यांची एकूणच सर्व कथा अनुभव संपन्न आहे. त्याच बरोबर त्यांच्या कथेतून चित्रित झालेले ग्रामीण जीवनावरील विविध पैलू लक्षात घेता समृद्ध अनुभव, सूक्ष्म निरीक्षण व जीवनातील बेगडीपणा, अकारण व्याकुळता या विषयी त्यांच्या मनात असणारा तिरस्कार या स्वरुपात त्यांची कथा चित्रित झाली आहे.

भोसले यांच्या पहिल्याच 'गार सावली' या कथासंग्रहातून चित्रित झालेली कथा ग्रामीण परिसरातील जीवनाचे भेदक चित्रण करणारी आहे. खेडेगावातील रसरशीत जिंवत अनुभव ती मांडते. त्याच बरोबर अस्पृश्यतेचे प्रभावी चित्रण करण्यात ती समर्थ ठरली. 'खिल्लारी जोडी', 'भागीदारीण' यासारख्या कथा शेतकऱ्यांचे जिवंत चित्रण करण्यात यशस्वी ठरल्या तर 'मुका मार' ही कथा अस्पृश्यांच्या दु:खाला

वाचा फोडणारी महत्त्वपूर्ण कथा ठरली. त्यामुळे त्यांच्या या कथासंग्रहाला त्यांच्या कथा वाङ्मयात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

'नांदाय जाते' हा भोसले यांचा दुसरा ढंगदार ग्रामीण प्रेम कथांचा संग्रह वास्तववादी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवितो. त्यांच्या या कथासंग्रहातील प्रत्येक कथेत कथावस्तु अतिशय चोखंदळ वृत्तीनेच निवडली आहे. प्रत्येक कथेत ग्रामीण साध्यासुध्या नि निरागस जीवनाची छटान्‌छटा उमटली आहे. त्याच बरोबर उपेक्षित लोकांची बाजू ठसठशीतपणे त्यांनी मांडली आहे.

'अहेव लेणं' हा त्यांचा तिसरा कथासंग्रह ग्रामीण जीवनातील भावनिकतेचे प्रभावी चित्रण घडवितो. त्याच बरोबर या कथासंग्रहातून लेखक सफाईदारपणे निवेदन करतात त्यामुळे हा कथा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'पाहुणेर' हा त्यांचा कथासंग्रह ग्रामीण जीवनाचे प्रभावी वास्तव चित्रण करतो. भोसले यांनी या कथासंग्रहातून जिवंत व्यक्तिचित्रे डोळ्यासमोर उभी केली आहेत. त्याच बरोबर या कथासंग्रहातील भाषाशैली साधी, सोपी व आकर्षक आहे.

भोसले यांच्या 'पाझर' या कथासंग्रहातूनही त्यांनी ग्रामीण जीवनाचे रंगतदार असे चित्रण केले आहे. या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रे अचूक, जीवनस्पर्शी अशा भरघोस व्यक्तिमत्वाने रसिकांना सदैव भुरळ पाडतात.

'ग्रामीण कथा' हा त्यांचा निवडक कथांचा संग्रह असून 'गार सावली', 'नांदाय जाते' व 'पाहुणेर' या कथा संग्रहातील कथा निवडून तो बनविण्यात आला आहे. निव्वळ ग्रामीण जीवनावरील कथांचा हा संग्रह आहे. छोटी चटकदार वाक्ये, चमकदार शब्दफेकी व रसपूर्ण संवाद यांनी नटलेल्या या कथासंग्रहातून ग्रामीण वातावरण लेखकाने समर्थपणे उभे केले आहे. त्यामुळे हा कथासंग्रह महत्त्वपूर्ण ठरला आहे.

'कथा जन्माची कथा' हा कथासंग्रह लेखकाच्या कथा लेखनामागील प्रेरणा सांगून कथा लेखनासाठी कोणती साधने वापरली याचे विवेचन करतो. त्याच बरोबर भोसले यांनी आपले लेखनविषयक अनुभव कथा जन्मापूर्वीची कथा सांगत असताना स्पष्ट केले आहेत.

एकंदरीत म. भा. भोसले यांच्या एकूण कथा वाङ्‌मयाचा विचार करता त्यांची सर्व कथा ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्रण करणारी कथा आहे. तिच्यातील अनेक पैलू ग्रामीण कथा निकषाला जवळचे ठरणारे आहेत. त्यामुळे मराठी ग्रामीण कथेत त्यांची कथा उल्लेखणीय ठरली आहे.

'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' हे दोन कथासंग्रह त्यांच्या एकूण कथा वाङ्‌मयात सरस ठरलेले कथासंग्रह आहेत. 'अहेव लेणं' हा कथासंग्रह सत्य घटनेतील प्रसंगांना प्राधान्य देत असून त्यातील जिवंत व्यक्तिचित्रे वाचकांचे मन आकर्षित करतात. त्यांच्या या कथासंग्रहातील कथा कथानक प्रधान आहे. त्यामुळे सकस ग्रामीण कथांचा संग्रह म्हणून या 'अहेव लेणं' कथासंग्रहाकडे पाहता येईल.

मानवी जीवनातील संघर्षाचे जिवंत चित्रण करून मानवतेची पूजा करणारा नायक ग्रामीण भागात वावरतो या गोष्टीचा पूरेपूर प्रत्यय भोसले यांनी 'अहेव लेणं' या कथा संग्रहातून आणून दिला आहे. त्यामुळे त्यांच्या यापूर्वीच्या दोन कथा संग्रहापेक्षा या कथा संग्रहाचे समीक्षकाकडून प्रचंड स्वागत झाले. मुंबई सरकारने या कथा संग्रहाला एक हजार रुपयाचे बक्षिस दिले. या कथा संग्रहाबाबत अनेक वृत्तपत्रातून परीक्षणे आली. त्यांच्या या कथासंग्रहाबाबत 'चिकित्सक'- बेळगांव मध्ये लिहिले गेले.

''म. भा. भोसले यांची भाषा काळ्या जमिनीप्रमाणे सकस, पिळदार व सामान्य लोकांना समजेल अशी आहे. अलंकार, जड शब्दांचा डामडौल ते आपल्या भाषेवर कधीच चढवित नाहीत, हे त्यांच्या या कथासंग्रहातील कथांचे वैशिष्ट्यच आहे.''[१०]

'ग्रामीण कथा' हा निवडक कथांचा संग्रह भोसले यांच्या संपूर्ण कथा वाङ्‌मयात वाचकांचे मन आकर्षित करून घेणारा महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास करत असताना साधारणत: दोन प्रवाह लक्षात येतात ते म्हणजे एका प्रवाहात प्रेमाचे सूत्र आहे तर दुसऱ्या प्रवाहात संघर्षमय जीवनाचे चित्रण आहे. अस्पृश्यतेच्या नावाखाली पिढ्यानपिढ्या त्यांना राबवून घेतले

जाते त्या वर्गाचे चित्रण त्यांनी केले आहे. ग्रामीण भागात ही अस्पृश्यता कशी मूळ धरुन आहे याचे प्रभावी चित्रण या कथासंग्रहाच्या माध्यमातून घडते. मानवी भावनांची भरती ओहोटीच या कथा संग्रहातील कथेतून पाहावयास मिळते. त्यामुळे एकूण कथेत हा कथासंग्रह महत्त्वपूर्ण ठरतो.

म्हणून म. भा. भोसले यांच्या एकूण कथा वाङ्मयात 'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहाचे स्थान जाणीवपूर्वक लक्षात घेण्यासारखे आहे.

मराठी कथेचा एकूण प्रवाह हरिभाऊ आपटे यांच्यापासून सखाकलाल, चारुता सागर, बाबा पाटील, महादेव मोरे यांच्या पर्यंत येतो तेव्हा त्या प्रवाहातील कथा वैभवसंपन्न असलेली दिसून येते. या एकूण मराठी कथेच्या प्रवाहात म. भा. भोसले यांची कथा स्वातंत्र्यापूर्वीच्या नवकथेच्या काळात व त्यानंतरच्या काळात लिहिली गेली आहे. भोसले यांच्या कथेने स्वातंत्र्याच्या मागेपुढे बरेच काही अनुभवले असल्याने ती अनुभवसंपन्न आहे. त्यामुळे त्यांच्या कथेचे स्थान कथा वाङ्मयात महत्त्वपूर्ण आहे.

म. भा. भोसले यांच्यावर वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांच्या विचारांचा व लेखन तंत्राचा प्रभाव पडला आहे. त्यामुळे मराठी कथेत भोसले यांच्या कथेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कथेतून सेवादलाचे, सुधारणावादी विचारसरणीचे व मानवतावादी विचारांचे प्रभावी चित्रण झालेले दिसून येते त्यामुळे त्यांच्या कथेचा जाणीवपूर्वक विचार करावा लागतो.

त्याच बरोबर व्यंकटेश माडगूळकरांची नवकथा ज्या प्रमाणे एका विशिष्ट प्रदेशाचे चित्रण करणारी ठरली आहे. तिला ज्याप्रमाणे वैशिष्ट्यपूर्णता लाभली आहे त्याप्रमाणेच भोसले यांनीही आपल्या कथेसाठी मिलवडीचा परिसर निवडला आहे. त्या प्रदेशाचे ती चित्रण करते त्याच्या बाहेर ती जात नाही.

मराठी कथेप्रमाणेच भोसले यांची कथा आशयानुरूप, अनुभवसंपन्न, भावनाप्रधान व प्रसंग डोळयासमोर उभा करणारी आहे. त्यामुळे तिचे स्थान मराठी कथेत वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या कथेबाबत के. ना. कुलकर्णी म्हणतात,

''ग्रामीण जीवन अनुभवणाऱ्याला त्यांच्या कथातील व्यक्तिचित्रे खास ओळखीची वाटतील. त्यांचे तोंडवळे हरघडी त्या जीवनांत दिसून येतील. सवंग लोकप्रियता मिळावी म्हणून कांही भोसले यांनी आपल्या कथांना ग्रामीण साज चढविला नसून खेड्यांतील समाजाची सुखदु:खे, भावभावना यांच्या अनुभूतीतूनच त्यांची कथा-चित्रे निर्माण झाली आहेत आणि म्हणूनच ती जिवंत अन् जातिवंत वाटतात.''[११]

'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहांचा अभ्यास करता भोसले यांच्या कथा लेखनाचे सामर्थ्य फार मोठे आहे हे लक्षात येते. भोसले यांची संपूर्ण कथा अनुभवाला जास्त प्राधान्य देणारी आहे. तिच्यातून चित्रित झालेले जीवन कष्टकऱ्यांचे आहे. त्यामुळे त्या कथेला कथा वाङ्मयात योग्य ते स्थान लाभले आहे.

त्याचबरोबर कथा लेखनाच्या संदर्भात भोसले यांनी जे पाहिले, अनुभवले त्या विचारातूनच त्यांची कथा तयार होत गेली आहे. म्हणजेच त्यांची कथा वास्तवतेला प्राधान्य देते.

भोसले यांची कथा सामान्य माणसाच्या भावनेला हात घालते. ती मानवता, माणूसकीचे चित्रण जास्तीत जास्त स्वरुपात घडविते त्यामुळे भोसले यांच्या कथेला वैशिष्ट्यपूर्णता लाभली आहे.

म. भा. भोसले यांची संपूर्ण कथा नवकथेच्या काळात लिहिली गेल्याने तिला योग्य ते वैशिष्ट्य लाभले आहे. एका बाजूला नवकथा गाजत असताना भोसले सुद्धा मिलवडीच्या परिसरातील कृष्णाकाठचा प्रदेश आपल्या कथेतून रंगवित होते. त्यामुळे मराठी कथेत लघुकथा लिहिणाऱ्या वि. स. खांडेकरांच्यापर्यंत म. भा. भोसले व त्यांची कथा जाऊन पोहचलेली दिसते. भोसले यांच्या कथा लेखनाचे सामर्थ्य ओळखून खांडेकर त्यांच्या विषयी म्हणतात,

''सहजासहजी डोळ्यांत न भरणाऱ्या पण काळजांत घुसलेल्या बाणाच्या टोकांप्रमाणे पदोपदी सलणाऱ्या खेडेगांवातील मूक दु:खांप्रमाणे तिथले अबोलके आनंदाचे क्षणही भोसले अनेकदां डोलदार रीतीने चितारतात. आपल्या हत्तीसारख्या बैलांचा अभिमान बाळगणाऱ्या आणि त्यांच्या जीवावर पंधरावीस खंडी वजनाचे लाकूड वाहून आणण्याची पैज जिंकणाऱ्या 'खिल्लारी जोडी' या गोष्टीतल्या

हंबीरचे वर्णन वाचताना आपण एक अटीतटीचा क्रिकेटचा सामना पाहात आहोंत आणि त्यात विजयी झालेल्या विरांच्या गौरवात भाग घेत आहोंत असेच कुणाहि शहरी वाचकाला वाटेल. हंबीरच्या या पराक्रमाचें भोसल्यांचे वर्णन मोठे वाचनीय वठलें आहे.''[१२]

म. भा. भोसले यांच्या 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातून शेतकरी वर्गाचे, त्याच्या राबत्या जीवनाचे चित्रण जास्तीत जास्त स्वरुपात आले आहे. ग्रामीण भागात शेतकरी हा महत्त्वाचा घटक असतो. त्या संबंधीचे चित्रण ग्रामीण कथेतून येणे क्रमप्राप्त ठरते. त्या शेतकरी वर्गाचे चित्रण भोसले यांनी आपल्या कथेतून प्रभावीपणे केल्याने ते त्यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य ठरते. त्यांच्या कथालेखनाबाबत मधुकर गुर्जर म्हणतात,

''म. भा. भोसले यांची लेखणी ग्रामीण जीवन रंगविण्यात चांगलीच तरबेज झालेली दिसते. त्यांच्या लेखणीचा कल्पना विलास ही दांडगा दिसतो. लघुकथेच्या अंतरंगात अधूनमधून ते अलंकार, विनोद, सुंदर वाक्ये यांची पेरणी एखाद्या सराइताप्रमाणे करतात.''[१३]

एकंदरीत म. भा. भोसले यांच्या ग्रामीण कथेचा विचार करता त्यांची लेखणी ग्रामीण जीवनाशी पूर्णपणे एकरूप झालेली दिसते. त्यांनी आपल्या कथेतून जीवनातील संपूर्ण घटकांना स्पर्श केला आहे याची जाणीव त्यांची कथा वाचल्यानंतर होते.

भोसले यांच्या संपूर्ण कथेचा अभ्यास केल्यानंतर मराठी कथेत त्यांची कथा कोणत्या दर्जाची आहे याची प्रचिती येते. ही कथा खेड्यातील सर्व अंगाना स्पर्श करण्यात सरस ठरली आहे. त्यामुळे मराठी कथेत भोसले यांची कथा यशस्वी ठरली आहे. हे समीक्षकांनी आणि साहित्यिकांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायावरुन लक्षात येते. म्हणून भोसले यांचे कथा वाङ्मयातील स्थान लक्षात घेता त्यांची कथा सर्वसामान्य वाचकापर्यंत किती समर्थपणे पोहचली आहे हे लक्षात येते.

म. भा. भोसले यांच्यासारखा बहुजन समाजात जन्मलेला एक कथालेखक ग्रामीण परिसराचे चित्रण अत्यंत तळमळीने व धाडसाने करतो यातच त्यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य किती मोठे

आहे हे लक्षात येते. म्हणूनच भोसले यांची कथा श्रेष्ठ दर्जाची जरी ठरत नसली तरी ती चांगल्या दर्जाची आहे हे मान्यच करावे लागते.

**✳ निष्कर्ष :-**

१. म. भा. भोसले यांनी ग्रामीण माणसाचे जीवन जवळून पाहिले. त्यामुळे त्या परिसरात वावरणारा शेतकरी, शेतमजूर यांचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून अत्यंत प्रभावीपणे केले.

२. भोसले यांनी आपल्या 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातून ग्रामीण भागातील दारिद्र्याचे, दु:ख पिडीत माणसाचे, त्याच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण केले त्यामुळे त्यांच्या कथा वाङ्मयात त्यांना यश मिळवून द्यायला हे कथा संग्रह महत्त्वपूर्ण ठरले.

३. 'अहेव लेणं' हा भोसले यांचा कथासंग्रह खेड्यातील संघर्षमय जीवन, कौटुंबिक प्रेम व माणुसकीचे चित्रण करत असल्याने त्यांच्या कथा वाङ्मयात हा कथासंग्रह महत्त्वपूर्ण आहे.

४. 'ग्रामीण कथा' हा कथासंग्रह स्वातंत्र्यानंतरच्या बदललेल्या समाजाचे, बदललेल्या मानवी जीवनाचे चित्रण करत असल्याने तो प्रभावी ठरला तेव्हा वृत्तपत्रानी त्याची बरीच दखल घेतलेली दिसते.

५. 'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' या दोन कथासंग्रहांना भोसले यांच्या एकूण कथा वाङ्मयात महत्त्वपूर्ण स्थान मिळाले याचे कारण हे कथासंग्रह ग्रामीण माणसाचे दु:ख चित्रित करून वास्तवतेला प्राधान्य देतात त्यामुळे त्यांची कथा वाचकांच्या पर्यंत लवकर पोहचलेली दिसते.

६. म. भा. भोसले यांच्या एकूण कथेसंबंधी आनंद यादव, मुकुंदराव किर्लोस्कर, श्री. के. क्षीरसागर या समीक्षकांनी आपली मते व्यक्त केली आहेत. ती भोसले यांच्या कथेला किती यश मिळाले आहे हे समजून द्यायला कारणीभूत ठरतात.

७. म. भा. भोसले यांच्या संपूर्ण कथा वाङ्मयात 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथा संग्रहाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे याचे कारण त्यांच्या कथेतून ग्रामीण जीवनातील विविध पैलू चित्रित झाले आहेत.

८. म. भा. भोसले यांच्या कथेवर वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, व्यंकटेश माडगूळकर यांची नवकथा या सर्वांचा प्रभाव पडल्याने त्यांची कथा एका स्वतंत्र प्रदेशाचे चित्रण करते.

९. भोसले यांची संपूर्ण कथा अनुभवाला प्राधान्य देणारी असल्याने व तिच्यात कष्टकऱ्यांचे जीवन चित्रित झाल्याने 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथा संग्रहाचे सामर्थ्य मोठे आहे.

१०. एकूणच भोसले यांची कथा तळागाळातील माणसांचे जीवन चित्रित करत असल्याने, ती ग्रामीण जीवनाशी पूर्णपणे एकरूप झाल्याने मराठी कथेत ती यशस्वी ठरली आहे.

११. म. भा. भोसले यांची कथा एकूण कथा वाङ्मयात श्रेष्ठ ठरत नसली तरी ती चांगल्या दर्जाची कथा आहे याची प्रचिती त्यांची संपूर्ण कथा वाचल्यानंतर लक्षात येते.

## तळटीपा

१. 'लोकसत्ता' - मुंबई- ९ स्प्टेंबर १९६२- परीक्षण

२. 'विशाल सहयाद्रि'- पुणे -७ जुलै १९६३-परीक्षण

३. मुलाटे वासुदेव- 'ग्रामीण कथा'- पृष्ठ. १०६

४. 'मौज'- मुंबई- १३ फेब्रुवारी १९६२ - परीक्षण

५. क्षीरसागर श्री. के. - 'गार सावली'- प्रस्तावना, पृष्ठ. ७

६. मुलाटे वासुदेव - 'ग्रामीण कथा'- पृष्ठ. ४४

७. यादव आनंद -'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', पृष्ठ. १७

८. 'लोकमान्य' - मुंबई - २७ जुलै १९५६-परीक्षण

९. क्षीरसागर श्री. के. 'गार सावली' - प्रस्तावना- पृष्ठ. २

१०. 'चिकित्सक' -बेळगांव- ८ जाने. १९५२- परीक्षण

११. कुलकर्णी के. ना. - 'साप्ताहिक संगम'- १५ डिसेंबर १९५५-परीक्षण

१२. खांडेकर वि. स. - 'मनोहर'- फेब्रुवारी १९४९

१३. 'चिकित्सक' - बेळगांव - ४ एप्रिल १९५०

****